
Peer Reviewed Refereed and UGC
Listed Journal Journal No. 47037

ISSN 2278-8158
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL



# ROYAL

Volume IX, Issue II
December - May
English / Marathi

Ajanta Prakashan

ISSN 2278-8158
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Volume - IX Issue - II December - May - 2020-21

English / Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed**
**and UGC Listed Journal**
**Journal No. 47037**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2019 - 5.756**
**www.sjifactor.com**

❖ **EDITOR** ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ **PUBLISHED BY** ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - II - DECEMBER - MAY - 2020-21
**ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 5.756** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल<br>**डॉ. पुरुषोत्तम वारलू रामटेके** | १-४ |
| २ | ग्रंथालय आणि संगणकीरण<br>**श्री. सुरेश विष्णू सोनवणे** | ५-८ |
| ३ | राजर्षी शाहु महाराज व वेदोक्त प्रकरण<br>**प्रकाश भिकाजी तुपे** | ९-१० |
| ४ | शाहू महाराज व लोकमान्य टिळक<br>**गादेकर मंगेश धर्मेंद्र** | ११-१७ |
| ५ | मानवी संसाधन व्यवस्थापन आणि विकास<br>**निलेश शिवमुर्ती ससाणे** | १८-२१ |
| ६ | 'कृष्णाकाठ' मधील यशवंतराव चव्हाण यांचे कौटुंबिक जीवन<br>**डॉ. मनमोहन राजे** | २२-२७ |

VOLUME - IX, ISSUE - II - DECEMBER - MAY - 2020-21
ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 5.756 (www.sjifactor.com)

# ६. 'कृष्णाकाठ' मधील यशवंतराव चव्हाण यांचे कौटुंबिक जीवन

**डॉ. मनमोहन राजे**
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

भारताचे अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांचा भक्तिभावाने उल्लेख केला जातो. तत्कालीन सातारा जिल्ह्यातील आणि आजच्या सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्र ह्या गावी त्यांचा जन्म १२ मार्च, १९१४ रोजी झाला. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या आणि भारताच्या राजकारणामध्ये लौकिक प्राप्त केला. तत्पूर्वी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रिय होऊन महात्मा गांधींच्या विचाराने त्यांनी वाटचाल केलेली आहे. कॉंग्रेस पक्ष आणि विचारांशी एकनिष्ठ राहिल्यामुळेच राज्य आणि देश पातळीवर यशवंतराव चव्हाणांना मानाचे स्थान होते. त्यांचे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र १९८४ साली प्रकाशित झाले. जडणघडण, वैचारिक आंदोलन, निवड इत्यादी प्रकरणातून यशवंतरावाच्या जीवनाचा पट उलगडत जातो. प्रस्तुत निबंधामध्ये यशवंतरावांचे कौटुंबिक जीवन कशा पध्दतीचे होते ते पहावयाचे आहे. यशवंतरावांचे बंधू, आई, पत्नी आणि इतर नातेवाईक ह्यांचाही त्यांच्या कर्तृत्वात हिस्सा आहे. यशवंतरावांना स्फूर्ती, प्रेरणा देण्याचे काम ह्या मंडळींनी केले आहे. त्यामुळेच त्यांच्या कार्याला सुवर्णझळाळी आलेली आहे.

वाघोबा चव्हाण हे यशवंतरावांचे आजोबा. त्यांना दोन मुले होती. मोठ्या मुलाचे नाव रामचंद्र, तर लहान मुलाचे नाव बळवंतराव. बळवंतराव चव्हाणांना ज्ञानदेव, गणपतराव आणि यशवंतराव अशी तीन अपत्ये होती. त्यांचे मूळ गाव खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर भाळवणी हे होते. तेथील एका कर्जदराने फसवणूक केल्यामुळे चव्हाण कुटुंबाला ते गाव सोडून द्यावे लागले होते. त्यानंतर विट्यामध्ये येऊन थोड्याफार असलेल्या जमिनीवर ते उदरनिर्वाह करतात. हा प्रसंग यशवंतराव चव्हाणांच्या आईने त्यांना सांगितलेला आहे.

यशवंतराव चव्हाणांचे मूळचे घराणे हे शेतकऱ्याचे आहे. रामचंद्र चव्हाणांचे थोडेफार शिक्षण झाल्यामुळे त्यांना सरकारी नोकरी मिळते. ते बेलिफाचे काम करतात. शेती थोडी असल्यामुळे चव्हाण कुटुंबाचे शेतीच्या उत्पन्नावर उदरनिर्वाह चालत नाही असे दिसताच, रामचंद्र चव्हाण हे आपल्या लहान भावाला म्हणजेच बळवंतराव चव्हाणांना बेलिफची नोकरी लावतात. विटे, दहिवडी, कराड अशा ठिकाणी दोघेजण नोकरी करून कुटुंबाची आर्थिक गरज भागवतात.

यशवंतराव चव्हाणांना पितृप्रेम फारसे लाभले नाही. त्यांच्या वडिलांचे अकाली निधन झाले. चव्हाणांनी ते अतिशय कारूण्यपूर्ण शब्दामध्ये सांगितलेले आहे. कराडला प्लेगची साथ सुरू झालेली असल्यामुळे, कुटुंबाचा त्यापासून बचाव करण्यासाठीच बळवंतराव चव्हाण आपले कुटुंब देवराष्ट्रला पाठवितात व ते नोकरी करीत राहतात. बळवंतरावांना प्लेगची लागण झाल्यामुळे कालांतराने सासुरवाडीला ते येतात. घरी जाताना लहान यशवंत त्यांना भेटतो, मात्र नेहमीप्रमाणे ते त्याला उचलुन कडेवर घेत नाहीत. पुढे त्यांचे प्लेगच्या साथीमुळे निधन झाले. यशवंतरावांनी हा दुःखकारक प्रसंग गहिऱ्या शब्दामध्ये व्यक्त केलेला आहे. यशवंतराव



PRINCIPAL
Shivaraj College of Arts, Commerce
& D.S.Kadam Science College,
GADHINGLAJ (Dist.Kolhapur)